# श्रीहनुमान उपासना

(मारुतीस्तोत्र व श्रीहनुमान चालिसासहीत)



संकलन व लेखन :
गुरुदास



# श्रीहनुमान उपासना

(मारुतीस्तोत्र व श्रीहनुमान चालिसासहीत)

---

संकलन व लेखन

**गुरुदास**

सातम उद्योग™
www.satamudyogbooks.com

- ई-बुक आवृत्ती

- संकलन व लेखन : गुरुदास

- प्रकाशक : हेमंत स. साटम

- मुद्रक : साटम उद्योग
  २०३, अमित इंड. इस्टेट,
  लालबाग, मुंबई-४०० ०१२.
  ८१६९९ ८४९२७


© सर्व हक्क प्रकाशकाच्या स्वाधीन

# दोन शब्द !

**दे**वदेवतांची उपासना करणं ही प्रथा काही अलिकडच्या काळातली नाही. ती वेदकाळापासून वेगवेगळ्या स्वरुपात अखंडपणे चालूच आहे. स्तोत्रपठण किंवा नामजप हे उपासनेचे सोपे प्रकार आहेत. मारुतीचं गुणगान स्तोत्र रुपाने करण्याची परंपरा तशी खूप जुनीच आहे. या उपासनेचा प्रसार समाजातील सर्व स्थरात रुजविण्याचं मोठं कार्य समर्थ रामदासांनी केलं. छत्रपती शिवरायांच्या अथक  प्रयत्नातून रामराज्य स्थापन व्हावं ही त्यांची आकांक्षा. ती पूर्ण होण्यासाठी लोकांचा राजा सुद्धा रामासारखा असून उपयोगाचे नाही तर शिवशाहीतील प्रजासुद्धा हनुमंतासारखी शूर, पराक्रमी आणि राजनिष्ठ असायला हवी, या प्रबळ मनोकामनेतून त्यांनी महाराष्ट्रात हनुमंताची उपासना वेगवेगळ्या प्रकारे जनमनात रुजवली. गावोगावी मारुतीची मंदिरे उभी केली. अकरा मारुतींची स्थापना केली. हनुमंताच्या अंगी असलेल्या गुणांचं महात्म्य वर्णन केलं आणि जनलोकांना कळकळीने ते सांगितलं.

'भीमरुपी महारुद्रा' हे मारुतीचं स्तोत्र तर सर्वांना परिचयाचं आहे. या स्तोत्राखेरीज समर्थांनी आणखी बारा स्तोत्रे लिहिली आहेत. मारुतीची 'सत्राणे उड्डाणे' ही समर्थांनी लिहिलेली आरती तर सर्वतोमुखी आहे.

श्रीगणपती उत्सवात तसेच प्रत्येक शुभ प्रसंगी ती नित्यनेमाने मनोभावे म्हटली जाते.

मारुती हा अनेक गुणांनी संपन्न असलेला देव आहे. मारुती हा जसा सर्वशक्तिमान तसाच तो दुष्ट शक्तींचा संहारकही आहे. म्हणून मारुती हा शंकराचा रुद्रावतार आहे असं मानलं जातं. मारुती महाप्रतापी आहे. युद्धात तो नेहमी अजिंक्य असतो. तो वायूसारखा गतिमान (मारुततुल्य) आहे. तसाच तो बुद्धिमंतात वरिष्ठ आहे. पुन्हा तो श्रीरामाचा श्रेष्ठतम भक्त आहे. त्याच्या दास्यभक्तीमुळेच भक्तवत्सल श्रीरामाने त्यास चिरंजीव पद दिलेलं आहे. तेज, धैर्य, चातुर्य, सामर्थ्य, पराक्रम, पुरुषार्थ, विजय, नितिमत्ता, बुद्धी आणि ब्रह्मचर्य या सद्‌गुणांचा परमोत्कर्ष म्हणजे मारुतीराय ! अशा या गुणसंपन्न देवतेचं समर्थ रामदास यांनी लिहिलेलं मारुती स्तोत्र म्हणूनच अतिशय प्रभावी व गुणकारक आहे हे अनुभवाने सिद्ध झालं आहे. संत तुलसीदास यांचं 'श्रीहनुमान चालिसा' हेही असंच अतिशय प्रभावी स्तोत्र आहे. दोघेही श्रीरामाचे परमभक्त

आपण ज्या देवतेची उपासना करतो त्या देवतेच्या अंगी असलेले गुण आपल्या स्वभावात उतरतात अशी थोरामोठ्यांची धारणा आहे. मारुतीच्या उपासनेने भाविकांच्या स्वभावातही मारुतीरायाचे गुण अंशमात्रे का होईना पण उतरोत हीच शुभ कामना.

□□□